
स्क्रीन रिडरचा बादशहा

सांज दैनिक बीड
RNI : Regd.No.MAH/MAR/2010/43846

# वास्तव



भारतरत्न रतनजी टाटा यांच्या महान देशभक्तीला समर्पित
वास्तवची २० वर्षे
एडिटर इन चिफ- जितेंद्र सिरसाट




## थोडक्यात



### पैठण पोलीस ठाणे हद्दीत दोन पोलिस चौक्यांना मान्यता

**पैठण : सर्जेराव खडसन**
पैठण शहरास धार्मिक तसेच पर्यटनाचे शहर म्हणुन सर्वत्र ओळखले जाते. येथे राज्यातून नाहीतर परराज्यातून भाविक व पर्यटक मोठ्या संख्येने येतात. तसेच मागील काही वर्षांत या शहराचा झपाट्याने होणारा विस्तार व वाढती लोकसंख्या पाहता त्यांच्या सुरक्षिततेसाठी पैठण पोलीस ठाण्यांच्या अंतर्गत नवीन पोलिस चौकी स्थापना करण्यात यावी ही मागणी येथिल भाविक भक्त व नागरिकांची होती. या मागणीच्या अनुषंगाने पोलिस अधीक्षक ग्रामीण विनयकुमार राठोड यांनी पोलीस चौकीच्या जागेची उपलब्धता, तसेच वाढीव मनुष्यबळ व याबाबत येणाऱ्या संभाव्य खर्चाचा वस्तुनिष्ठ तपशील सादर करण्याचे निर्देश दिले त्यानुसार संत एकनाथ महाराज समाधी स्थळ (बाहेरील नाथ मंदिर) तसेच पैठण तालुका व अहिल्यानगर जिल्ह्याच्या हद्द असलेल्या शेवगाव मार्गावरील खुले कारागृहाच्या आसपास अशा दोन ठिकाणी पोलीस चौकी उभारण्यास प्रशासनाकडून मान्यता मिळाली आसल्याची माहिती पैठण पोलीस ठाण्यांचे पोलीस निरीक्षक संजय देशमुख यांनी दिली आहे.



# बळीराजा लागला कामाला!

# खरीप पूर्वमशागतीला वेग; शेतात बांध बंदीस्ती सुरू!


- शेतामधील गवत, कडबा यासह इतर पिके काढून कोळपणीला केली सुरुवात
- मृग नक्षत्र सुरू झाल्यानंतर खऱ्या अर्थाने पेरणी करण्या साठी काही भागात नियोजन
- पावसाने साथ दिल्यास जून मध्यापर्यंत पेरणी पूर्ण होण्याची शेतकऱ्यांनी व्यक्त केली शक्यता

## मे अखेर पाऊस बरसणार असल्याने शेतकऱ्यांचे खरीप पेरणीकडे लक्ष केंद्रित!

**बीड : प्रतिनिधी**
शेतकरी आता खरीप पेरणीच्या तयारीला लागले असून शेतशिवारात मशागत करण्याची घाई सुरू झाली आहे. सर्वत्र ट्रॅक्टरने नांगरणी सुरू असल्याचे चित्र दिसत आहे. रब्बी हंगामातील पिके घेऊन आता शेतकरी खरीप पेरणीकडे लक्ष केंद्रित करताना दिसत आहेत. शेतामधील गवत, कडबा यासह इतर पिके काढून कोळपणीला सुरुवात केली आहे. एकीकडे लग्नसराई आणि दुसरीकडे शेतकामांची घाई असे चित्र जिल्ह्यात सर्वत्र दिसत आहे.

### पेरणीयुक्त पाऊस पडल्यावरच पेरणीस सुरुवात

मेच्या अखेरपासून खरिपाच्या धूळपेरणीला सुरुवात होते, परंतु शेतकरी पेरणीयुक्त पाऊस पडल्यावरच पेरणीस सुरुवात करतात. शेतकरी कापूस, मका, सोयाबीन आणि मिरची पिकाची मोठ्या प्रमाणात पिके घेत असतात. या पिकांसाठी शेतीमध्ये शेणखत वापरून जमिनीची मोठ्या प्रमाणात मशागत केली जाते. पावसाळ्यात शिवारात पाणी साचण्यासाठी बांध असण्याची नितांत गरज आहे. त्यामुळे बांधावर माती टाकून त्याची मजबूत बांधणी शेतकरी दरवर्षी करत असतात. या वर्षीही शेतकरी बांधावर माती टाकून मजबूत करण्याच्या कामामध्ये गुंतले आहेत.



### काही भागात पेरणीसाठी मशागत सुरू!

सध्या अनेक भागातील शेतकरी मिरची लागवडीच्या तयारीत दिसत आहे. अनेक भागातील गावातील शेतकरी मल्चिंग अंथरूण ठिबकवर मिरची लागवड पध्दतीवर भर देत आहेत. सध्या काही भागातील शेतकऱ्यांनी धूळ पेरणीसाठी मशागत सुरू केली आहे. शेणखत टाकून ते पसरवण्याचे कामही सुरू झाले आहे. मृग नक्षत्र सुरू झाल्यानंतर खऱ्या अर्थाने पेरणी करण्यासाठी काही भागातील शेतकरी नियोजन करतात. पावसाने साथ दिल्यास जून मध्यापर्यंत पेरणी पूर्ण होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

### सध्या पारंपरिक शेती करणे अवघड!

यंत्राच्या साहाय्याने मशागत सध्या पारंपरिक शेती करणे अवघड झाले आहे. मजुरांचा तुटवडा तसेच काम करताना अधिक वेळ लागत असल्यामुळे शेतकऱ्यांनी यंत्राच्या साहाय्यानेच शेती करण्यावर भर दिला आहे. बैलजोड्यांची संख्याही कमी झाली आहे. त्यामुळे ट्रॅक्टर तसेच इतर यंत्राच्या साहाय्याने शेतीतील कामे केले जात आहेत. त्यामुळे वेळेची बचत होत आहे.

## बीडमध्ये ऐन पावसाच्या तोंडावर मोठ्या नाल्यांची सफाई रखडली!

**बीड :** पावसाळा काही दिवसांवर आला आहे. जिल्हाधिकारी विवेक यांनी ३१ मेपर्यंत मान्सूनपूर्व कामे पूर्ण करण्याचे आदेश दिले आहेत. मात्र बीड पालिकेचे मान्सूनपूर्व टेंडरच निघालेले नाहीत. ● पान ३ वर...

### पावसाळा तोंडावर तरीही बीडमध्ये गल्लीतील लहान नाल्यांचीच सफाई सुरू, टेंडर नाही!



### स्वच्छता मोहीम सुरू!

मान्सूनपूर्व स्वच्छता मोहिम शुक्रवारपासून सुरू केली आहे. २ जेसीबी आणि ६ टेम्पोद्वारे नाली सफाई करण्यात येत आहे. लवकरच मनुष्य बळ आणि यंत्रसामग्री वाढवून शहरातील १६ मोठं-मोठे नाले साफ केले जातील. - **भागवत जाधव**, स्वच्छता प्रमुख, बीड

## बिडकीन पोलिसांना सदरक्षणाय खलनिग्रहणाय या ब्रिद वाक्याचा विसर पडला?

### बोकाळलेल्या अवैध्य धंद्याचे अड्डे उध्वस्त करून गुंड प्रवृत्तीच्या लोकांची मस्ती जिरवा!!

**पैठण : सर्जेराव खडसन**
महाराष्ट्र राज्य पोलिसांचे सद्ररक्षणाय खलनिग्रहणाय ज्याचा अर्थ चांगल्याचे रक्षण, व दुर्जनांचा नायनाट हे ब्रिद वाक्य पोलिसांच्या भूमिकेचे आणि जबाबदाऱ्यांचे प्रतिबिंब आहे. ज्यामध्ये कायदा व सुव्यवस्था अबाधित राखत गुन्हेगारी व गुन्हेगारांना नेस्तनाबूत करत जनतेचे संरक्षण करणे समाविष्ट आहे. परंतु बिडकीन पोलिसांकडून त्यांच्या हद्दीत या ब्रीद वाक्याला पुरती हरताळ फासल्याचे दिसुन येत आहे. जिकडे पहावे तिकडे गुंडगिरी, अवैध धंदे सुरु असल्याने या अवैध्य धंद्यांमुळे अनेकांचे संसार उघड्यावर येऊन देशोधडीला लागले आहेत. तरी पोलीस प्रशासन इतके गप्प गार का बसले हा समजायला मार्ग नाही.

सध्याच्या घडीला बिडकीन शहराची ओळख व वाटचाल ही अवैध धंद्याचे माहेर घर अशी बनत चालली आहे याचे कारणम्हणजे सुस्तावलेली पोलिस यंत्रणा तसे जर नसते तर शहरात मागील काही वर्षांपासून काही व्हाईट कॉलर गुंड प्रवृत्तीच्या लोकांकडून बिनदिक्कतपणे जीवघेणा गुटखा आख्या तालुक्यात होणारा पुरवठा करुन लाखो रुपयांची उलाढाल होत आहे तसेच तलाठी कार्यालय शेजारी व फारोळा गावा लगत खुलेआम चालु असलेली चक्री, शासकीय रुग्णालय (घाटी) रोड वरील बुग्गीपत्त्यांच्या अड्डा तसेच शहरातीलबसस्थानकाच्या बाजूच्या गल्लीतील काही दुकानात इतके राजरोसपणे चालणारे अवैध्य धंदे चालुच झाले नसते. ● पान ३ वर...



(भाग 2)

## एक थेंब जवानांसाठी रक्तदात्यांनो, पुढाकार घेत रक्तदान करा : ॲड. शेख शाहजेब

**बीड : प्रतिनिधी**
भारत-पाकिस्तान युद्ध सुरू आहे. यात काही जवान शहीद, तर काही जखमी होत आहेत. त्यांना वाचविण्यासाठी आपण पुढाकार घेत रक्तदान करावे, असे आवाहन जिल्हा रुग्णालय प्रशासनाने केले आहे. यासाठी या ठिकाणी करा रक्तदान बीड शहरातील सोमेश्वर मंदिरात सोमवारी रक्तदान करता येईल. तसेच गुरुवारी स्वामी समर्थ मंदिर, शनिवारी शनि मंदिर आणि पेंडगाव हनुमान मंदिरात शिबिराचे आयोजन केले आहे. याशिवाय आपण जिल्हा रुग्णालयातील रक्तपेढीत येऊनही रक्तदान करू शकता, असे ॲड. शेख शाहजेब यांनी केले आहे.



जिल्हा रुग्णालयातील रक्तपेढीत सध्या रक्ताचा ठणठणाट आहे. अशातच भारत-पाकिस्तान युद्ध सुरू झाले आहे. त्यानुषंगाने आरोग्य विभागालाही सतर्क राहण्याच्या सूचना ● पान ३ वर...

## शेतकऱ्यांचे नुकसान होऊ देणार नाही - आ. संजना जाधव

### तालुकास्तरीय खरीप हंगाम बैठकीत महत्वपूर्ण निर्णय

**कन्नड : विशाल भालेराव**
तालुक्यातील तालुकास्तरीय खरीप हंगामाच्या तयारीचा आढावा घेण्यासाठी विशिष्ट बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीस मा. आमदार संजना ताई जाधव यांचीअध्यक्षस्थानी प्रमुख उपस्थिती लाभली होती. या बैठकीला तहसीलदार कन्नड विद्याचरण कडवकर, तालुका कृषी अधिकारी कन्नड संदीप शिरसाठ, तालुका कृषी अधिकारी सोयगाव आर. जी. गुंडीले, पोलीस निरीक्षक सानप, तालुका कृषी निविष्ठा विक्रेता संघटनेचे राजेंद्र खंडेलवाल व विविध विभागाचे प्रमुख उपस्थित होते. ● पान ३ वर...






## थेट पंतप्रधान मोदींना विचारले प्रश्न

### शरद पवार गटाच्या नेत्या रोहिणी खडसे संतापल्या

# भाजपने चिल्लरपणा बंद करावा!

**जळगाव : प्रतिनिधी**
भारतीय जनता पक्षाच्या वतीने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे पाकिस्तानवर केलेल्या हल्ल्याबद्दल कौतुक करणारी पोस्ट करण्यात आली आहे. या पोस्टवर आता राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या नेत्या रोहिणी खडसे या चांगल्याच संतापल्या आहेत. भाजपने हा चिल्लरपणा बंद करावा, असे आवाहन त्यांनी केले आहे. इतकेच नाही तर त्यांनी थेट पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना देखील यावरून प्रश्न विचारले आहेत.



### आपल्या 40 पैसेवाल्यांना सांगा की, असल्या पोस्ट बंद करा!

● या संदर्भात केलेल्या एका पोस्टच्या माध्यमातून रोहिणी खडसे यांनी भारतीय जनता पक्ष राजकारण करत असल्याची टीका केली आहे. याचा परिणाम देशाच्या एकजुटीवर या शिवाय भारतीय सैन्याच्या मनोबलावर देखील होईल, असे देखील त्यांनी आपल्या पोस्टमध्ये म्हटले आहे. त्यामुळे आपल्या 40 पैसेवाल्यांना सांगा की, असल्या पोस्ट बंद करा, असे आवाहन त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना केले आहे.

### चिल्लरपणा बंद करा - रोहिणी खडसे

● राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या नेत्या रोहिणी खडसे यांनी भाजपच्या एका पोस्टला प्रत्युत्तर देत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना प्रश्न विचारले आहेत.

यामध्ये त्यांनी म्हटले की, मा. नरेंद्र मोदी जी, भाजप हे जे काही करत आहे ते आपल्याला पटते आहे का ? देश संकटात असताना सर्व जण पक्ष, राजकारण बाजूला ठेवून एकसंध उभे आहेत. हे भाजपला बघवत नाही का ? भारतीय सैन्याचे जवान आपल्या प्राणांची बाजी लावून पाकिस्तान विरोधात लढत आहेत. अशा परिस्थितीत भाजप असे राजकारण करत असेल तर याने देशाच्या एकजुटीवर फरक तर पडेलच शिवाय सैन्याच्या मनोबलावरही परिणाम होईल. त्यामुळे आपल्या ४० पैशावाल्यांना सांगा की असला चिल्लरपणा बंद करा. असे आवाहन रोहिणी खडसे यांनी केले आहे.